दि. ३१.१०.२०११

प्रति,
**श्री संपादक / जिल्हा प्रतिनिधी,**
नांदेड

स.न.वि.वि.
नांदेड वाघाळा शहर मनपाचे आयुक्त डॉ. निपुण विनायक यांनी नांदेड शहरातील स्वच्छता चळवळ, अपेक्षा व महापालिकेची भुमिका याविषयावर परिणामकारक पध्दतीने मांडलेले विचार एकुण सात भागात लेखस्वरुपात आपल्याकडे पाठवत आहे. **सदरचा लेख आपल्याकडे उपलब्ध जागेनुसार विविध भाग स्वरुपात, एकत्र अथवा लेखातील विविध मुद्दयांच्या आधारे स्वतंत्र बातमीस्वरुपात प्रसिध्द करण्यासाठी उपयुक्त ठरेल.** कृपया सोबतचा लेख आपल्या सोयीप्रमाणे लवकरात लवकर प्रसिध्द करुन साऱ्या नांदेडकरांना स्वच्छतेबाबत प्रेरीत करुन विधायक व सामाजिक कार्यात हातभार लावावा, ही विनंती.

सदरच्या लेखात व्यक्त झालेली मते ही डॉ. निपुण विनायक यांची व्यक्तीगत मते असून त्यांच्या मताशी महापालिका प्रशासन अथवा पदाधिकारी सहमत असतीलच, असे नाही. तसा उल्लेखही लेखाच्या सुरुवातीलाच करण्यात आला आहे. सदरचा लेख मी स्वत: शब्दांकित केला आहे. लेखासंबंधी अनुरुप एकुण २३ छायाचित्रे सोबत पाठवत आहे. कृपया लेख अथवा बातमीच्या प्रत्येक टप्यात ते प्रसिध्द करावे, जेणेकरुन मजकूर आणखी आकर्षक दिसू शकेल. सदरची लेखमाला **डॉ. निपुण विनायक (भा.प्र.से.)** यांच्या नावासह प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
**(गोविंद करवा)**
जनसंपर्क अधिकारी
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
संपर्क : ८८८८८ ४७१३७

**नां**देड शहर कसे असले पाहिजे? याबाबत प्रत्येकाच्या मनात वेगवेगळया आणि चांगल्या कल्पना असू शकतील. या सर्व कल्पना तीन घटकात मोडू शकतात. १) स्वच्छ व सुंदर शहर २) मुलभूत सुविधायुक्त शहर ३) सर्व समावेशक शहर.

या सर्व कल्पना पुर्ण होण्यासाठी आव्हाने आणि त्या दिशेने करावयाचे प्रयत्न याबाबत नांदेड वाघाळा शहर मनपाचे **आयुक्त डॉ. निपुण विनायक (भा.प्र.से.)**यांनी लिहीलेली लेखमाला आजपासून प्रसिध्द करीत आहोत. डॉ. विनायक यांनी आतापर्यंत जालना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगडचे जिल्हाधिकारी तसेच राज्याच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे उपसचिव म्हणून अतिशय प्रभावीपणे जबाबदारी हाताळली आहे. गेल्या वर्षभरापासून नांदेड वाघाळा शहर मनपाचे आयुक्त म्हणून ते कार्यरत आहेत. या काळात त्यांनी नांदेडमध्ये जवळून अनुभवलेल्या, पाहिलेल्या समस्या व त्यावर शोधलेले उपाय याचा वृतांत त्यांच्याच शब्दात जशास तसा:

**(या लेखात व्यक्त झालेली मते ही डॉ. निपुण विनायक यांची व्यक्तीगत आहेत.)**

---

(भाग : १)

# स्वच्छता- स्वप्न आणि स्वप्नपुर्ती

**भा**रतीय संस्कृती ही स्वच्छतेची संस्कृती म्हणून ओळखल्या जाते. आजही आमच्या गरीब झोपडपट्टीतील घरासमोर सकाळीच साफसफाई करुन रांगोळी काढण्याची प्रथा आहे. महाराष्ट्रात विशेषत्वाने या प्रथेचा अवलंब केला जातो. निटनेटकेपणाची काळजी घेणाऱ्या प्रत्येकाकडून आपल्या देशात एखादी चूक झाली की, विदेशातील संबंधित विषयाशी तुलना केली जाते. स्वच्छतेचा मुद्दा याला अपवाद असूच शकत नाही. आमच्या शहरातील लोक परदेशात जाऊन तेथील स्वच्छता, निटनेटकेपणा, शिस्त आणि चांगल्या व्यवस्थेचे कौतूक करुन गुणगान गातात आणि आपले शहर असे का नाही? याचा सारा दोष शहराच्या पालक संस्थेवर लोटून देतात. स्वच्छता ही आमची संस्कृती असेल तर शहर स्वच्छ ठेवण्याचे काम इतके अवघड अणि अशक्य का झाले असेल की, `येथे तुम्हास उघडयावरील संडास, गुटख्याची पाकीटे, केळीचे सालपट, प्लॉस्टीक शहरातल्या कोणत्याही कानाकोपऱ्यात दिसणार नाही,`असे भारतातील एकही शहर आज छातीठोकपणे सांगु शकत नाही. अनेक लोकांच्या मनात असे वाचल्यानंतर पहिला मुद्दा समोर केला जातो. तो म्हणजे `शहराची स्थानिक संस्था आपले काम व्यवस्थीत पार पाडत नाही !`

संस्कृती ही एका संस्थेतून बनत नाही. ती संपूर्ण समाजातील एकंदरीत व्यवहारावरुन ठरत असते. आमची संस्कृती इतकी विवश आणि कमजोर झाली आहे का, की एखाद्या संस्थेन आपले काम व्यवस्थीत केले नाही की ती मोडून जाईल? सामाजिक बदलासाठी फक्त एखादा कायदाच कारणीभूत ठरु शकतो ? याची उत्तरे शोधायची असतील, तर सर्वात आधी खालील प्रश्नांची उत्तरे शोधावी लागतील. १) हे शहर कोणाचे आहे? २) हे शहर म्हणजे काय? शहरातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्था की शहरातील सर्व घरे ? ३) स्वच्छतेचा बदल घडवून आणायचा असेल तर निर्धार, ध्येयवेडेपणा, कृती करण्याची तयारी (फक्त तक्रारी नको) कोणाची असावी? ४) अस्वच्छता कशी पसरते व त्यामुळे कोणाचे व कसे नुकसान होते ?

`मला नांदेड स्वच्छ करायचे आणि ते करण्यासाठी मी स्वतः काहीतरी करायला पाहिजे. पाहिजे नाही तर चला करु या!` असा प्रत्येकाच्या मनात येणारा विचार हीच स्वच्छतेच्या स्वप्नातील गुरुकिल्ली होय. आणि मित्रहो, गंमत अशी की, हा सुविचार शंभर टक्के लोकांच्या मनात रुजण्यापर्यंत थांबण्याची गरज नाही. माझ्या मते अंदाजे ३० टक्के लोकांच्या मनात हा विचार रुजला तर पुढे - पुढे या कामास गती येईल आणि सहज शक्य होईल, हे या विचाराचे एक मुख्य अंग आहे. उदा. आमचाच एखादा व्यक्ती परदेशात जातो तेव्हा तेथे तो वेळेचे बंधन पाळण्याची, इकडे - तिकडे घाण न करण्याची काळजी घेतो. परंतु आपल्या स्वतःच्या शहरात तो तसा वागत नसेल. का ? कारण तेथील सर्वत्र असलेल्या स्वच्छ वातावरणात हा माणूस इतरांपेक्षा वेगळा वागायला तयार होऊ शकत नाही. परंतु आपल्याकडे सर्वचजण जसे करतात, तसे हा सुध्दा `चलता है ` म्हणून निष्काळजीपणे घाण करत असतो. त्यामुळे मित्रहो, नांदेड शहर स्वच्छ व सुंदर व्हायचे असेल तर या स्वप्नाने प्रत्येकाच्या मनात घर केले पाहिजे. आणि कुठेही कचरा फेकताना, थुंकताना, लघुशंका करताना एकदा तरी स्वतःला विचारावे की मी माझ्या घरी असेल तर असे केले असते का? एवढेच नव्हे तर जितका वेळ मी काम करतो, त्या पूर्ण वेळेत मी तर असे करीत नाही, माझ्या समोर कोणाला असे करु देणार नाही, इथपर्यंतची जिद्द व उत्साह आमच्या मनात असली पाहिजे. अस्वच्छतेच्या पारतंत्र्यावर विजय मिळवला तर हा विजय दुसऱ्या स्वातंत्र्यासारखाच असेल. हे स्वातंत्र्य सोपे, कोणत्याही कष्ट आणि त्यागाशिवाय मिळू शकेल.

हा विचार मनात आणून आपल्या सवयीत बदल घडवणे, ही जगातील सर्वात अवघड कामे आहेत. मानसशास्त्रतज्ज्ञांचे याबद्दल काय म्हणणे असेल मला माहित नाही. परंतु आमच्या लक्षात एक गोष्ट आली आहे. भाषण आणि उपदेश यातून कोणाच्या मनावर परिणाम होत नाही. ही मानवी वृत्तीच होय. आमच्या मनाला पटणाऱ्या गोष्टीसाठी आम्ही कुठल्याही पातळीवर जातो. पण आम्हास सांगितलेल्या गोष्टीच्या नेमक्या विरुध्द दिशेने कृती करण्याची आमची इच्छा होते. **(क्रमशः)**

---------------------------------------------------------------------------------------------

(भाग : २)

# अशी घडतेय स्वच्छतेची क्रांती

**स्व**च्छतेच्या प्रश्नासाठी जर लोकांचे मन परिवर्तन करावयाचे असेल तर त्यासाठी नियमित वापरात असलेले प्रचार प्रसिध्दी संवादाचे घटक (IEC) फारसे उपयोगी ठरत नाहीत. कारण ते मूलत: या तत्वावर आधारित असतात की सांगणाऱ्यांना ऐकणाऱ्यापेक्षा जास्त ज्ञान, माहिती आणि काळजी आहे. याउलट लोकांच्या समस्येचे समाधान लोकांकेडूनच निघू शकते या तत्वावर आधारित नांदेड शहरामध्ये मागील सहा ते आठ महिन्यापासून वापरात असलेली प्रणाली, समूह संचालित संपूर्ण स्वच्छतेवर आधारीत आहे. याचे तत्व असे आहे की त्या समस्याशी झुंजणारे लोक मग ते शिकलेले असो की अशिक्षीत ; बुध्दजिवी आणि स्वत:च्या अडचणीवर मात करण्याची क्षमता ठेवणारी माणसे. त्यांच्या व्यवहाराला, सवयीला मोडण्यासाठी त्यांच्याशी चर्चा केली जाऊ शकते आणि त्या चर्चेतून अडचणीचे विश्लेषण त्यांच्यामार्फतच करुन घेऊन त्यांचे समाधानही (तोडगा) त्यांच्यामार्फतच काढला जाऊ शकतो, असा तोडगा स्वावलंबी, चिरकाल टिकणारा व लोकांमध्ये स्वत:साठी काहीतरी केल्याचा आत्मविश्वास भरवणारा असतो. त्याचे सुख, त्याची अनुभूती शब्दास व्यक्त केली जाऊ शकत नाही. फक्त अनुभवली जाऊ शकते. ती शक्ती, तो आत्मविश्वास, ते सुख कसे असते, याचे आम्ही साक्षीदार आहोत.

मग ते हमालपुरातील त्या महिला, ज्यांनी त्यांचे बंद पडलेले सार्वजनिक स्वच्छतागृह सुरु करुन त्यांच्या गल्लीतील उघडयावरील हागणदरी बंद केली. आणि त्यांचे परिसर स्वच्छ ठेवणे सुरु ठेवले. उदयनगरमधील त्या ४० कुटुंबाचा निर्धार ज्यांनी मनपाच्या घंटागाडीवर अवलंबून राहता सौ. सुलोचना मुखेडकर यांनी तयार केलेल्या कंपोस्ट खड्डयामध्ये ओला कचरा टाकणे सुरु केले. ज्ञानेश्वरनगर सिडकोमधील नेरलकर काकु व त्यांची नातवंडाची वानरसेना, जे स्वच्छतेसाठी पेटून उठले आहेत. पक्कीचाळ मधील कापरासारखे लोक ज्यांनी चाळीत कायम दिसणारी अस्वच्छतेची सर्वांच्या मनात असलेली प्रतिमाच बदलून टाकली. नवी आबादीतील खान मॅडम व त्यांची टीम, ज्यांनी त्यांच्या गल्लीतील लोकांशी वेळप्रसंगी विरोध पत्करुन हा बदल घडवून आणला. आज तिथली मुले, लोक शिट्टी मारुन घंटागाडीच स्वागत करतात आणि ज्या कामाला आधी अर्धातास लागूनही घंटागाडीत पूर्ण कचरा जात नव्हता तेच काम पाच मिनीटात पूर्ण करण्याचा चमत्कार त्यांनी घडवला. एसटी क्वार्टर / पोलिस कॉलनीतील ती महिला आणि ते तरुण ज्यांनी वरच्या मजल्यावरुन कचरा खाली फेकण्याची प्रथा बदलून टाकली. लिंबोनीनगर मधील त्या अंगणवाडीतील बायका ज्यांनी हरित नांदेडची सुरुवात त्यांच्या गल्लीपासून करुन प्रत्येक घरासमोर झाडे लावून त्यांचे संगोपन केले आहे. गुरु कर्मवीरनगर येथील एक विधीज्ञ व इतर काही मंडळींनी महिलांची ४० लोकांची समिती स्थापून स्वयंस्फुर्तीने स्वच्छतेविषयी अशा म्हणी लिहील्या. ``तुमचा उध्दार कोणीही करणार नाही, त्यास समर्थ असाल तर तुम्ही तुमचाच विचार करावा - डॉ. आंबेडकर`` या म्हणी तेथे वास्तवातही उतरत आहेत. स्वच्छतेसाठी रस्त्यावर उतररायला तयार असणारी शहरातील शाळा आणि कॉलेजसचे ते असंख्य मुले, मुली...... अशी कितीतरी उदाहरणे आज देता येतील.

### कचरा : समस्या नव्हे, संपत्ती !

नांदेड शहरामधील नॉलेजलिंक व फिडबॅक इन्फ्रास्ट्रचर या दोन संस्था ज्या भारतात समूह संचलित संपूर्ण स्वच्छतेसंदर्भात काम करणाऱ्या तज्ञ संस्था आहेत, त्यांच्या मदतीने आणि त्या-त्या भागातील लोकप्रतिनिधी यांच्या माध्यमातून गेल्या सहा महिन्यापासून हे काम सुरु आहे. या प्रक्रियेत त्या-त्या भागातील लोकांशी संपर्क करुन तेथील अस्वच्छतेच्या विषयावर चर्चा घडवून आणून स्थानिक

पातळीवरच त्यावर तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जात आहे. नांदेडमधील एकूण ५८९ वस्तीपैकी २५० वस्त्यांमध्ये या कामाची सुरुवात करण्यात आली असून तेथील लोकांनी या प्रयत्नाला खूप प्रतिसाद दिलेला आहे. त्या सर्व वस्त्यातल्या लोकांना माझा सलाम..! ते लोक नांदेडच्या स्वच्छतेच्या स्वप्नपूर्तीचे ते पहिले शिलेदार ठरतील, एवढे नक्की! त्या वस्त्यांमधील लोकांची स्फुर्ती पाहून आता मनपाही त्या वस्त्यांकडे अधिकचे लक्ष देण्यासाठी (अकाउंटेबल) ठरली आहे. या वस्त्यांनी त्यांच्या परीने त्यांच्या भागात कचरा न टाकण्याचे व उघडयावरील हागनदारी बंद करण्याचा अमुलाग्र बदल केला असून आता दुसऱ्या टप्प्यात त्या वस्त्यातील स्वच्छतेच्या दुसऱ्या टप्प्यातील पावलेही उचलतील अशी मला आशा आहे. याचा अर्थ त्या वस्त्या आता स्वतःच्या कचऱ्याचे व्यवस्थापन स्वतः करुन स्वावलंबी कसे बनतील, हे त्यांच्या समोरचे आव्हान आहे. हे काम अवघड असेल, पण अशक्य नाही. हे आम्हास उदयनगर, लिंबोनीनगर, एसटी क्वार्टर, गौतमनगर, सांगवी सारख्या नगरांनी दाखवून दिले आहे. सुका आणि ओला कचरा वेगवेगळा करुन ओल्या कचऱ्याची त्या वस्तीमध्येच विल्हेवाट लावणे- त्यातून कोणतीही दुर्गंधी, डास, माशा उद्‌भवत नाही, हे पाहावयाचे असेल तर उदयनगर येथे भेटी द्याव्यात. - स्तुत्य उपक्रम जर का पहिल्या टप्प्यातील सर्व २५० वस्त्यांमध्ये कार्यान्वित झाले तर कचरा आमची समस्या नव्हे तर ती आमची संपत्ती होईल, यात शंका नाही.

**पहिल्या टप्याचा गड सर केलेल्या क्रांतीकारांसाठी दुसरा टप्पा**

या पहिल्या टप्प्यातील वस्त्यांना माझे असेही आवाहन आहे की, त्यांच्या भागामध्ये अस्वच्छतेवर केलेली मात आणि उघडयावर होणारी हागणदारी बंद करुन जी उर्जा आणि आत्मविश्वास त्यांच्यात आला आहे, तो वाया जाऊ देऊ नये. त्यांची वस्ती, प्रथमतः हिरवेगार बनवावी. यासाठी लागणारी झाडे आणि ट्री गार्ड ही मदत आपणास मनपा व गुरुव्दारा लंगरसाहिब तर्फे उपलब्ध करुन दिली जाईल. मात्र झाडे लावणे आणि त्यांना मुलासारखे जगवणे, या अवघड कामाची शक्ती आता तुमच्यात आली असून तुम्ही हे पार पाडू शकाल. स्वच्छता जर का आरोग्यासाठी महत्वाची असेल तर त्यास आवश्यक असलेले दोन जोडीदार- स्वच्छ पाणी आणि वैयक्तिक स्वच्छता हे तितकेच महत्वाचे आहे. **(क्रमशः)**

(भाग : ३)

# स्वयंचलित व्यवस्थापनासाठी सज्ज व्हा

**स्व**च्छ पाण्यासाठी अशा वस्त्या त्यांच्या भागातील पाण्याचे व्यवस्थापन त्यांच्या हातात घेऊ इच्छित असेल तर महानगरपालिकेने भागीदारी योजनेत तशी तरतूद करुन ठेवली आहे. मग आपणच त्या भागातील रहिवाशांकडून पाणीपट्टी वसूल करावी, पाण्याची कुठेही गळती होऊन किंवा इतर मार्गाने वाया जाऊन गैरसोय होणार नाही, याची दक्षता घ्यावी. सार्वजनिक पाणी पिण्याचे स्थळ असल्यास तेथे स्वच्छता ठेवावी. मनपास शुध्द पाणी आपल्यापर्यंत पोहचवण्यास जितका खर्च आला तितका खर्च उर्वरित पाणीपट्टीतून आपल्या भागातील पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेवर व्यवस्थापन करावे, असेही शक्य आहे. वैयक्तिक स्वच्छतेबद्दल काही बोलण्याची गरज नाही. शैक्षणिक संस्था, हॉटेल असो किंवा आई-वडील या लोकांनी मासिक पाळी स्वच्छता (Menstrual Hygiene) या विषयाकडे संवेदनशील दृष्टीकोनातून पाहणे आवश्यक आहे. त्याकरीता उचललेल्या कोणत्याही पावलाला मनपा सहाय्य करेल.

### करु शकतो, आणि केलेच पाहिजे

आता राहीला प्रश्न उरलेल्या वस्त्यांचा. ज्या वस्त्यांमध्ये आम्हास टप्या-टप्याने पुढील सहा महिन्यात म्हणजेच मार्च २०१२ पर्यंत स्वच्छतेचा संदेश पोहचवायचा आहे. आता काही विशीष्ट गोष्टीवर लक्ष देणे गरजेचे वाटते. सर्वात पहिले तर कोणकोणत्या भागाच्या अस्वच्छतेमुळे एकंदरीत शहर अस्वच्छ दिसते. त्या भागावर लक्ष द्यावे लागेल. शहरातील सर्व बाजारपेठेवर लक्ष देण्यासाठी त्यांच्यासोबत काम करण्याची गरज आहे. चौफाळा भागातील बाजारपेठेत जेव्हा तेथील दुकानदारांशी या विषयावर चर्चा केली. तिथल्या दुकानदारांनी लगेच त्यांच्या दुकानात कचरापेटी ठेवण्यास सुरुवात केली. आपल्यापैकीच असलेल्या आमच्या स्वच्छता सैनिकांनी जेव्हा एकदा एका दुकानासमोरचा कचरा स्वतः स्वच्छ करण्यास सुरुवात केली. तेव्हा तेथील दुकानदारांना ही जबाबदारी त्यांची स्वतःची असल्याचे लक्षात आल्यानंतर स्वतः झाडू हातात घेतला. प्रत्येक व्यापाऱ्यांशी, दुकानदार, पानटपरी, ठेले, हॉटेलचालक व अन्य जे हे लेख वाचताहेत, त्यांना माझा प्रश्न आहे की, असा समन्वय शक्य नाही का ? आपणास सोयीच्या असलेल्या वेळेत एक किंवा दोन वेळा मनपाचे ट्रॅक्टर किंवा घंटागाडी पाठवण्यात येईल परंतु आपण तोपर्यंत कचरा आपल्या कचरापेटी किंवा थैलीत एकत्र करुन ठेवता येणार नाही काय? तर आपल्यापैकी कोणाच्या मनात हे येत असेल की कचरापेटी वर आपण खर्च का करावा ? तर लिंबोनीनगरच्या गरीब महिलांकडे एकदा पाहावे ज्यांनी ओला व सुका कचरा ठेवण्यासाठी त्यांच्या हाताने पोत्यांच्या पिशव्या शिवल्या. जर माझी दुकान मी स्वतः स्वच्छ ठेवतो तर त्याच दुकानासमोर अथवा आजूबाजूला टाकलेल्या कचऱ्याची कोणास कीळस वाटत नसेल का? किंबहूना आपल्या दुकानाच्या शेजारी खुल्या जागेवर पडलेला कचरा पाहून ओलांडून आपल्या स्वच्छ दुकानात येण्याची कोणाची इच्छा होईल? मी मुंबईत छोटया-छोटया पानटपऱ्यावरही असे फलक लिहीलेले पाहिजे. ``कृपया स्वच्छता ठेवावी आणि कचरा कचरापेटीतच टाकावा.``

मुंबईत फुटपाथवर उभ्या असलेल्या अशा खाद्यपदार्थाच्या ठेल्यांनी खाणे संपल्यानंतर पेपर, कागदी प्लेट व उष्टी खाद्यपदार्थ संकलीत करण्यासाठी कचरापेटी ठेवलेली आहे. नांदेडमधील सुंदर अशा काही वस्त्या, बाजारपेठेत दुकानासमोर लागलेले कचऱ्याचे ढीग किंवा आठवडे बाजारानंतर होणारी अस्वच्छता पसरुच नये, म्हणून आम्ही सर्व काही करु शकू. येत्या काळात बाजारपेठेनिहाय अशा रितीने मनपा व दुकानदारांमध्ये समन्वय असण्यासाठी चर्चा व्हावी आणि या चर्चेतून यावर मार्ग निघावा. मला विश्वास आहे की, सर्व बाजारपेठ, व्यापारी संघटना याबद्दल काही करतील आणि त्यांच्या

बाजारपेठेत तरी कचरा उघडयावर टाकल्या जाणार नाही आणि ते सर्व जबाबदार नागरिक आहेत, अशी एक स्पर्धाच लागेल. मोठमोठया योजनेपेक्षा छोटीशी कृती महान असून मित्रहो, सर्व दुकानदार, सर्व व्यापारी, सर्व पानठेलेचालक जर त्यांच्या जन्मभुमी नांदेडचे हे ऋण- अस्वच्छता न करण्याच्या कृतीतून उतरवतील, असा मला विश्वास वाटतो.

## जबाबदारीचे भान आवश्यक

महानगरपालिकेने हाती घेतलेल्या तीन दिवसाच्या स्वच्छता महामोहिमेत एक गोष्ट अशी लक्षात आली की, या शहरात ठिकठिकाणी कचरा टाकण्याची काही स्थळे आहेत. यातील काही स्थळे तर अशी सापडली जे की सर्वसाधारणपणे कोणाच्याही नजरेत येत नाही पण तेथे वर्षानुवर्षे कचरा टाकला जातो. अशी स्थळे नियोजन करुन मनपाने टप्या-टप्यात स्वच्छ केली पाहिजे. पण ते स्वच्छ करीत असताना पुन्हा तेथे तशी घाण पडू नये, याची ही व्यवस्था केली पाहिजे. उदा. शिवाजीनगरमधील स्टेट बँक ऑफ हैदराबाद शेजारच्या मोठया खुल्या भूखंडावर पडलेला कचरा दिवसभर स्वच्छ करण्यात आला होता. आता त्या मोहिमेला एक महिनाही संपला नाही तेथे पुन्हा कागदे, प्लॅस्टीक, डुकरांचा मुक्त संचार व उघडयावर लघवी करणे सुरु झाले आहे. अशी स्थळे परत कचरायुक्त होणार नाही, यासाठी त्या जागेभोवती राहणाऱ्या लोकांसोबत चर्चा करावी लागेल आणि तेथे कचरा टाकला जाणार नाही, यासाठीच्या उपाययोजना अंमलात आणावी लागेल. यामध्ये प्रामुख्याने याच्या आजूबाजूला राहणाऱ्या लोकांचे मनपरिवर्तन, मनपातर्फे त्या भागातून नियमित कचरा उचलून नेण्याची व्यवस्था आणि त्या खुल्या प्लॉटधारकाला दंड या सर्व उपाययोजनाचा समावेश राहील.

तिसरे ज्या ठिकाणाहून मोठया प्रमाणावर कचरा निर्माण होतो. उदा. हॉटेल, केळी मार्केट, गुरुव्दारा लंगरसाहिब इ. अशा ठिकाणाची विशेष व्यवस्था त्यांच्याशी चर्चा करुन करावी लागेल. काही मोठी हॉटेल व इतर संस्था जर त्यांच्या कचऱ्याची स्वतः विल्हेवाट लावण्यासाठी बायोगॅस प्रकल्प इ. लावायला इच्छित असतील तर मनपातर्फे त्यांना सहाय्य केले जाईल.

## डॉक्टरांना आवाहन

नांदेडमध्ये उपलब्ध वैद्यकिय प्रतिष्ठानातून निर्माण होणाऱ्या जैविक आणि इतर कचऱ्याबद्दलही सर्व डॉक्टर बंधूंनी अधिक संवेदनशील व्हावे, असे मी त्यांना आवाहन करतो. विशेषतः जैविक कचऱ्याबद्दल असलेला निष्काळजीपणा लोकांच्या आरोग्यासाठी कसा धोकादायक होऊ शकतो, त्याचे प्रसंग अलीकडेच घडलेले आहे. मनपातर्फे लावण्यात आलेल्या ठेकेदारासोबत नोंदणी न करुन मी माझ्‍या महिण्याचे पाचशे रुपये वाचवू शकतो पण त्यासाठी मी शहरातल्या किती लोकांचा जीव धोक्यात टाकतो? हा प्रश्न बिगरनोंदणीकृत डॉक्टरांनी स्वतःला विचारावा. याशिवाय स्वच्छता मोहिमेच्या काळात डॉक्टरलेनमधून बाहेर पडलेल्या कचऱ्याची मात्रा बघून एक धक्काच बसला. या भागात आरोग्यावर दुष्परिणामाबद्दल जाणीव असलेली सर्वात जाणकार मंडळी राहते. तो भाग स्वच्छतेच्या या लढ्यामध्ये सर्वात पुढे राहील, अशी मी त्यांच्याकडून अपेक्षा करतो. मग माझ्या हॉस्पीटलमध्ये येणारे रुग्ण, नातेवाईक यांचा कचरा कुठे टाकतात, याकडे एक जबाबदार नागरिक व डॉक्टर अशा दोन्ही नात्याने जबाबदारी मी पार पाडेल, असा निर्धार माझे सर्व डॉक्टर बंधू करतील, अशी मी त्यांच्याकडून अपेक्षा बाळगतो. **(क्रमशः)**

---

(भाग : ४)

# कापूर, गौरी आणि शेण

कुठल्याही संस्था, समाज यामधील तीन प्रकारचे लोक राहतात, असे मला माझ्या एक सरपंच मित्राने मला सांगितले. १) कापूर २) गौरी व शेण. कापूर वृत्तीचे लोक असतात, जे कोणत्याही चांगल्या कामासाठी सर्वात पहिले पेटून उठतात व इतरांच्या पेटण्याची वाट बघत नाही. अशी माणसे १० टक्केच असतात. ज्यांच्यामध्ये काहीतरी नवीन वेगळे करण्याची जिद्द, उमेद व उत्साह असतो. तर्कवितर्कापेक्षा ते कृतीत अधिक विश्वास ठेवतात. या शहरातील वस्त्यातील जे लोक या स्वच्छतेमध्ये सर्वात आधी पेटून घेतले म्हणजे कापरासारखे होय. समाजातील ८० टक्के लोक गोवऱ्या असतात. गोवरीचा गुणधर्म म्हणजे ती पेटते पण तिला सातत्याने फुंकावे लागते, अशा या शहरातील ८० टक्के हळूहळू का होईना स्वच्छता मोहिमेत सहभागी होतील. फक्त १० टक्के लोक शेण वृत्तीचे असतात. `याचे काही खरे नाही` हे त्यांचे ब्रीदवाक्य असते. असे लोक कोणत्याही चांगल्या प्रयत्नात कधीही सहभागी होत नाही.

नांदेड शहरातील शाळा आणि कॉलेजमधील सर्व मले/मुली ज्यांनी आतापर्यंत या स्वच्छता मोहिमेत भाग घेतला आहे, ती या शहरातील कापरे आहेत. आता त्यांच्यासमोर जास्त मोठे आव्हान आहे. आतापर्यंत त्यांनी त्यांच्या संस्थेतील स्वच्छता, लोकांमध्ये जनजागृती व गणपती विसर्जनाच्या वेळी निर्माल्य संकलन सारखे स्तुत्य उपक्रम घडवले. येथून पुढे ते सर्व विद्यार्थी ज्या-ज्या भागात राहत असतील, त्या भागाच्या स्वाभाविक नेते म्हणून त्यांनी काम करुन त्या भागातल्या, वस्तीतल्या लोकांचे मन बदलून घेण्याचे प्रामाणिक प्रयत्न करावयाचे आहे. केल्याने होत आहे रे, आधी केलेच पाहिजे......

## स्वच्छता कामगारांच्या विषयी

स्वच्छतेच्या लढयातील या दुसऱ्या टप्यात अस्वच्छतेशी लढणारे खरे सैनिक म्हणजे स्वच्छता कामगार. यांच्याबद्दलही सर्वांना संवेदनशील व्हावे लागेल. नालीमध्ये उभे राहून तेथील कचऱ्यापासून थुंकी आणि `गू` देखील स्वच्छ करण्याचे हे काम कमी दर्जाचे नव्हे तर महान आहे. हे काम करत असताना या स्वच्छता कामगारांच्या अडचणी मनपातर्फे सोडवल्या गेल्या पाहिजेत. हे काम करताना त्यांच्या आरोग्याला धोका उत्पन्न होऊ नये, अशी साधने वापरण्यासाठी मनपाने त्यांच्याशी चर्चा करुन हा विषय हाताळला पाहिजे. यावेळी डम्पींग ग्राउंण्डवरुन कचरा वेचून विक्री करणारी मुले आणि व्यक्ती यांच्या विषयीही शहराने संवेदनशील दृष्टीकोन ठेवून त्यातल्या मुलांसाठी शिक्षणाची सोय व मोठया व्यक्तीसाठी कचरा संकलनाच्या शास्त्रीय पध्दतीत सहभागी करुन घेतले पाहिजे.

गणेश मंडळाने यावर्षी स्वच्छतेच्या जनजागृतीसाठी मोठया प्रमाणावर सहभाग घेतला. त्यासाठी सर्व गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांचे हार्दीक अभिनंदन! यानिमित्त वेगवेगळया गणेश मंडळांना भेटी देताना एक गोष्ट माझ्या लक्षात आली की, काही उच्चभ्रु वस्तीत मनपातर्फे सार्वजनिक कचरा कुंड्यांची व घंटागाडीची व्यवस्था असूनही त्या सार्वजनिक कचरा कुंड्यांभोवती पसरलेला कचरा दिसतो. बीएसयुपी योजनेच्या निमित्ताने उघडयावरील हागणदारी व कचऱ्याची समस्या झोपडपट्यामध्ये जास्त बिकट असल्यामुळे स्वच्छतेची कामे झोपडपट्टयापासून सुरु करण्यात आली. तेथील लोकांनी यास उत्तम प्रतिसाद दिला व त्यातील काही उदाहरणेही आम्ही या लेखात नमूद केली आहे. हे लोक गरीब, अशिक्षित तसेच माहिती तंत्रज्ञानापासून दूर असल्याने त्यांनी केलेल्या उत्कृष्ट कामाची चर्चा होण्यासाठी आजवर व्यासपीठ मिळाले नाही. असो. मात्र येथून पुढे बिगरझोपडपट्टी भागात, उच्चभ्रु वस्तीत (गणेश मंडळाच्या भेटीदरम्यान लक्षात आलेल्या बाबीवरुन) स्वच्छतेसाठी काम करण्याची तितकीच गरज वाटते. अशा काही ठिकाणाहून या कामासाठी मागणीही आली असून स्वच्छतेच्या कृतीचा हा एक सकारात्मक संकेत आहे. शहरात बिगर झोपडपट्टीत राहणारी १०० टक्के जनता या स्वच्छतेच्या लढ्यात उतरेल, असा मला विश्वास वाटतो. **(क्रमशः)**

(भाग : ५)

# मनपाचे घनकचरा व्यवस्थापन

**आ**तापर्यंत आम्ही स्वच्छता मोहिम सुरु असलेल्या वस्तीतील आव्हाने आणि करावयाची कामे आणि त्याशिवाय असलेल्या भागात आव्हाने व करावयाच्या कामाबद्दल चर्चा केली. हे सर्व वाचून वाचकांच्या मनात एक प्रश्न उद्‌भवू शकतो- मग मनपा काय करेल ? मित्रहो, आतापर्यंत आम्ही स्वच्छतेचा एकच पण सर्वात महत्वाचा विषयावर- म्हणजेच लोकांच्या मनात स्वच्छतेचा विचार रुजवणे व त्यासाठी कृती करण्याची तयारी त्यांच्यात असणे. यावर चर्चा केली. ही जिद्द आणि उत्साह स्वच्छतेच्या मोहिमेचा आत्मा आहे. यावर मनपानेही त्यांच्या कार्यक्षमता वाढवून कायद्यान्वये त्यांनी लोकांना उपलब्ध करुन देणारी सेवा द्यावी लागेल.

## लोकसहभागामुळे मनपाची जबाबदारी आणखी वाढेल

लोकांचे एक पाऊल पुढे उचलले गेल्यामुळे मनपाला आता दहा पावले उचलावे लागणार आहेत. म्हणजेच स्वच्छतेच्या या पूर्ण कामामध्ये मनपा त्यांची जबाबदारी लोकांवर टाकत नसून लोकांच्या सहकार्याने दहा पटीने त्यांची जबाबदारी पार पाडण्यासाठी कंबर कसत आहे. किती सोपे झाले आहे की, त्या-त्या मोहिमेतल्या नगरातील नागरिक यांची देखरेख समिती आता त्यांच्या नगरात घंटागाडी दररोज येते किंवा कसे? यावर केवळ नियंत्रणच ठेवत नाही तर त्यांच्यात समन्वय व सहकार्य घडवून आणत आहेत. घंटागाडी चालक यांचे फोन नंबर सारखी माहितीही सशक्त होऊन ही मंडळी मनपास त्यांची जबाबदारी पार पाडायला प्रवृत्त करीत आहे. आणि मनपातील या भागात काम करणारी मंडळीही लोकांचा ही सकारात्मक प्रतिसाद बघून तेथे मनापासून जोमाने आणि प्रेमाने काम करीत आहे.

एकीकडे जेव्हा लोकसहभागाची ही चळवळ त्यांचे जाळे पसरवत आहे, तेव्हा दुसरीकडे महानगरपालिकेने त्यांच्या कचरा व्यवस्थापनात सुधारणा घडवली पाहिजे. कचरा व्यवस्थापनाचे दोनच प्रमुख टप्पे आहेत. १) कचऱ्याचे संकलन व वाहतूक २) गोळा झालेल्या कचऱ्याची प्रक्रिया व विल्हेवाट. या दोन्ही टप्प्यावर सविस्तर चर्चा करणे गरजेचे आहे.

## कचऱ्याचे संकलन व वाहतूक

कायद्यान्वये शहरातील साफसफाई ही महानगरपालिकेची जबाबदारी आहे. याकरिता महानगरपालिकेने सर्व रस्त्याची साफसफाई, नाल्या काढणे, आणि कचऱ्याची वाहतूक करणे अपेक्षीत आहे. एका चांगल्या व्यवस्थेमध्ये एकतर आधी चर्चा केल्याप्रमाणे त्या-त्या भागातील विकेंद्रीत पध्दतीतील नागरिकांच्या सहभागाने कचऱ्याचे व्यवस्थापन झाले पाहिजे. जोपर्यंत सर्व नगर त्यासाठी पुढे येत नाही, त्यासाठी कचरा घरातून प्रत्येक झोनमध्ये एका तात्पुरत्या स्थलांतरीत स्थळांपर्यंत नेला पाहिजे, तेथून प्रक्रियेच्या ठिकाणापर्यंत नेला पाहिजे.याचा अर्थ असा होतो की, बंद वाहनामध्ये कचरा उत्पन्नाच्या स्थळापासून प्रक्रियेच्या स्थळापर्यंत पोहचला पाहिजे. जेव्हा हे काम मोठया स्केलवर म्हणजे पूर्ण शहरासाठी केले जाते तेव्हा यामध्ये काही प्रॅक्टीकल अडचणी उद्‌भवतात. यामध्ये सर्वात पहिले म्हणजे एखाद्या चांगल्या सक्षम कंत्राटदारांची निवड. त्या कंत्राटदाराने हे काम पूर्ण कौशल्याने केले पाहिजे. पूर्ण शहरासाठी हे काम करण्यासाठी लावावयाच्या यंत्रसामग्री जसेः ॲपे, ट्रॅक्टर, मनुष्यबळ (स्वच्छता कामगार) लक्षात घेता हे कामे सोपे नसेल, याचा अंदाज आपण घेऊ शकाल. विशेषतः याकरिता लागणारे मनुष्यबळ (स्वच्छता कामगार) सर्व स्थानिक असल्यामुळे कंत्राटदाराला त्या सर्व कामगाराशी चांगले संबंध ठेवताना त्यांना प्रोत्साहित करुन त्यांच्या कामावर नियंत्रण ठेवून हे काम त्यांच्याकडून करुन घेता आले पाहिजे. महानगरपालिका, कंत्राटदार, कामगार संघटना या सर्वांनी उदात्त हेतूने ही कामे हाती घेतली तर कामात वेग येईल.

## मनपासमोरील अडचणी

**जे**व्हा मोठया क्षेत्रात काम केले जाते, म्हणजेच संपुर्ण शहरात काम केले जाते तेव्हा त्या कामाची योग्य तपासणी व मुल्यमापनाचे सुत्रही असले पाहिजे. सर्वात योग्य सूत्र तर त्या भागातील सहकार करणारी नागरिकांची देखरेख समितीच होय. पण जोपर्यंत अशा समित्या सर्वत्र तयार होत नाहीत, तोपर्यंत मनपाला यावर अचूकपणे अंकुश ठेवले पाहिजे.

यासाठी कंत्राटदारांना InPut पेक्षा Output तत्वावर पैसा दिल्यास जास्त  पूरक व उपयुक्त ठरेल. सहा-सहा महिने ते एक वर्ष पूर्वी काम केलेल्या कामगारांच्या देयकाच्या संचिका माझ्यासमोर आल्या, तेव्हा मनपात वेळेवर काम केल्याची अचूक माहिती उपलब्ध नसल्याचे मला लक्षात आले. आश्चर्यपूर्वक म्हणजे ज्या-ज्या दिवशी त्यांनी काम केले, त्या-त्या दिवशीचा दैनंदिन अहवाल मुख्यालयी उपलब्ध नव्हता. यामुळे इतक्या वेळेनंतर स्वच्छतेसारख्या कामामध्ये त्यावेळेस केलेल्या कामाची खात्री पटनेही अशक्य असते आणि म्हणून अडचणी उद्‌भवतात. यामुळे उपस्थित कामगार आणि वाहनाचा दैनंदिन अहवाल पाठवण्याचा सूचना सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. कंत्राटदाराची देयके कामगारांच्या दैनंदिन उपस्थिती अहवालावरुन देण्याचे सुरु केले आणि याच्यामुळेच कंत्राटदारावर अनुपस्थित कामगार किंवा कमी यंत्रणेमुळे मोठा दंड बसेल. मात्र काही ठिकाणी गरजेपेक्षा जास्त लावलेल्या वाहनाचेही देयके त्या कंत्राटदारांना दिले गेले नाही.

कंत्राटदारांच्या कामाचे मूल्यमापन यामुळे सुधारले, परंतु त्यात अजूनही त्रुटया राहील्या. उदा. सकाळी कामगार कामावर आल्याबद्दलचे किंवा ॲपे, ट्रॅक्टर कामावर उपस्थित असल्याचे हजेरीवरुन त्यांनी काम केल्याचे गृहीत धरण्यात आले, मात्र जर त्या मजूरांनी / ट्रॅक्टर / ॲपेने आठ तास पूर्णत: काम केले नाही याचे परिमाण मोजण्याचे नियंत्रण कमी पडले. शेवटी कायद्यान्वये मनपावर ही जबाबदारी असल्याने ठेकेदाराच्या यंत्रणेकडून आमच्या सर्व स्वच्छता निरीक्षक / क्षेत्रीय अधिकाऱ्यांना काम करुन घेता आले पाहिजे होते. आणि त्यात आम्ही काही अंशी कमी पडलो. कामाच्या खाजगीकरणामुळे दुहेरी जबाबदारी झाल्याने मनपात जिथे एकीकडे कामात मदत मिळाली, तेथे थोड्या अडचणीही उद्‌भवल्या. **(क्रमश:)**

---

(भाग : ६)

# अशी आहे नव्या घनकचरा ठेकेदाराची जबाबदारी

**म**नपाने नवीन काढलेल्या निवीदेत या सर्व त्रुटीतून शिकवण घेऊन काही नवीन बाबीचा समावेश केला आहे. यात सर्वात पहिले आणि महत्वाचे म्हणजे ठेकेदाराला उचललेल्या कचऱ्याचे वजन करुन त्याप्रमाणे देयक दिले जाईल. याचा अर्थ देयकही Input तत्वावर नव्हे तर Output तत्वावर असणार आहे. त्यामुळे कंत्राटदार अधिक इच्छाशक्तीने प्रोत्साहनपर काम करु शकणार आहे. कचरा म्हणजेच त्यांच्यासाठी पैसा, हे लक्षात घेऊन कंत्राटदार जास्तीत जास्त कचरा उचलण्याचा प्रयत्न करेल आणि शहर या निमित्ताने स्वच्छ होईल. यापूर्वी असेही लक्षात आले आहे की, काही ठिकाणी कामगारांकडून कचरा डम्पींग ग्राउंडवर न नेता रस्त्यात कुठेतरी फेकण्याचे प्रकार घडत होते. नवीन निवीदेत प्रक्रियेच्या स्थळीच वजनकाटा बसवला जाणार असल्यामुळे कचरा प्रक्रियेच्या स्थळावर नेणे ठेकेदाराला फायद्याचे ठरेल. रस्त्यात कचरा ठेवला तर तो कचरा गोळा करणे, वाहतूक करणे याचा त्याला फायदा होणार नाही.

दुसरा महत्वाचा बदल म्हणजे लागणारे मनुष्यबळ आणि यंत्रणा. या बाबीचा प्रत्येक स्थळाचा प्रत्यक्ष अंदाज घेण्यात आला असून प्रत्येक वार्डनिहाय लागणारी यंत्रणा व मनुष्यबळ निश्‍चित करण्यात आले आहे. यामुळे प्रत्येक वार्डातील लोकप्रतिनिधी, देखरेख समितीला तेथील कामावर नियंत्रण व समन्वय करणे सोपे होईल. याशिवाय बाजारपेठेसाठी विशेष व्यवस्थेची तरतूद ठेवण्यात आली आहे. महत्वाचे म्हणजे हे अंदाज `किमान अत्यावश्यक` म्हणून नमूद करण्यात आले असून अधिक गरज उद्‌भवली तर ठेकेदाराने अतिरीक्त यंत्रणा वापरावी, परंतु त्याचा वेगळा मोबदला देण्यात येणार नाही. असेही या नव्या करारात स्पष्ट केले आहे. कारण मनपा त्या कंत्राटदाराला मजूरांच्या संख्येप्रमाणे नव्हे तर कचऱ्याच्या वजनाप्रमाणे देयक अदा करणार आहे.

मनपातील प्रत्येक सेवा कार्यक्षम आणि स्वावलंबी होण्यासाठी त्या सेवेतून मिळालेले उत्पन्न व त्या सेवेवर केलेला खर्च याचा ताळमेळ बसला पाहिजे. मनपाने प्रत्येक घरातून एवढेच नव्हे तर प्रत्येक मजल्यातून, मोठी हॉटेल्स, मंगल कार्यालयातून कचरा उचलावयाचा असेल तर मनपाने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे वाजवी असे युजर चार्जेस (सेवाशुल्क) आकारणी योग्यच आहे. याचे कारण असे की, या करामुळे मनपाला त्या-त्या घरातून/ त्या-त्या मंगल कार्यालय/ त्या-त्या हॉटेलमधून कचरा घेणे बंधनकारकच होईल. याचा अर्थ नागरिक त्यांना मिळत असलेल्या सेवेच्या प्रमाणाइतकेच सेवा शुल्क भरतील. त्यामुळे देण्यात येणाऱ्या सेवेमध्येही वाढ होऊन त्याचा दर्जाही सुधारेल. उदा. जर ३० दिवसाचे हॉटेलमधून अमूक रुपये मनपाला सेवाशुल्क म्हणून भरले तर ३० दिवस सदर हॉटेलमधून कचरा उचलला गेला पाहिजे, याचीही संबंधित हॉटेलचालक अथवा करदाता खात्री करेल. एकंदरीत या शुल्कामुळे लोकांना उपलब्ध होणाऱ्या सेवेमध्ये वाढ होईल, हे नक्की!

### यंत्रणा व मनुष्यबळाचे योग्य नियोजन हवे

सध्याचा मनपाचा घन कचरा व्यवस्थापनाचा खर्च अणि उत्पन्नातील आकडे पाहिले तर धक्कादायक आहे. मनपातर्फे वर्षभरात पाच कोटी रुपये कचऱ्याचे संकलन व वाहतूकीसाठी खर्च करण्यात येतात. किमान तेवढे उत्पन्न जरी मनपाला सेवाशुल्कातून मिळाले तर मनपा शाश्वतरित्या लोकांना विविध सेवा पुरवू शकेल. या सर्व सेवाशुल्कातून मनपाला अपेक्षीत उत्पन्न प्राप्त होईल, असा अंदाज आहे. माझ्या ऐकण्यामध्ये असेही आले आहे की, आजही काही भागातील लोक घंटागाडीवाल्यांना कचरा उचलण्याचे पैसे देतात. याचे नुकसान म्हणजे एकतर मनपाला हे उत्पन्न मिळत नाही, जेव्हा त्यावरचा पूर्ण खर्च मनपाला करावा लागतो. आणि दुसरे या वृत्तीमुळे घंटागाडीवाल्याची

वृत्ती; फक्त अशा लोकांकडून कचरा उचलण्याची राहील, ज्यांच्याकडून त्यांना पैसे मिळतात. माझे असेही ऐकण्यात आहे की तरोडयातील लोक मनपात समाविष्ट होण्यापूर्वी घंटागाडीवाल्याला महिन्याचे काही पैसे द्यायचे. मनपाकडे २५० ते ३०० कायम स्वच्छता कामगार आहेत. त्या सर्वाच्या पगारीपोटीही मनपाला अंदाजे पाच कोटी रुपये खर्च करावे लागतात. या मजुरांपैकी खूप वर्षापासून काही मजूर स्वच्छतेशिवाय इतर विभागात कामावर आहेत. लाड समितीच्या शिफारशीनुसार काही नव्याने लागलेले कामगार शिक्षीत असल्यामुळे स्वच्छतेच्या कामासाठी तेवढेसे उत्सुक नसतात. कायम मजुरांची कमतरता किंवा वरील नमूद कारणामुळे कचरा संकलन व वाहतूक ही व्यवस्था बऱ्याच शहरामध्ये खाजगीरित्या सुरु आहे. मी तर काही अशी शहरे पाहिले आहे की, ज्यामध्ये या खाजगी व्यवस्थेमुळे शहराची कचरा संकलन व वाहतूकीची समस्या बऱ्यापैकी सुटली. पण मनपाच्या स्वतःचे कायम मजुरांकडून उत्पादकरित्या काम करुन घेण्याचे आव्हान त्यांच्यासमोर आजही आहे.

## मनपा स्वच्छता यंत्रणेच्या वेतनाचे विभाजन

नांदेडमध्ये नव्याने काढलेल्या निवीदेप्रमाणे मनपातील स्वच्छता कामगार हेही खाजगी कंत्राटदाराच्या प्रणालीचा भाग म्हणून काम करतील. म्हणजेच कंत्राटदार या मजुरांना इतर मजुरांना कायद्यान्वये द्यावयाची किमान मजुरी देईल, उर्वरित वेतन या कर्मचाऱ्यांना मनपातर्फे सुरु राहील. यामुळे कर्मचारी कामही करतील आणि त्यांना शासनसेवेत इतके वर्ष केलेल्या कामाचा योग्य मोबदलाही मिळेल. तीन दिवसीय स्वच्छता महामोहिमेत माझ्या असे निदर्शनास आले आहे की, आमचे हे कायमचे स्वच्छता कामगार खूप प्रामाणिकपणे काम करण्यास सक्षम आहेत, मात्र त्यांना वरिष्ठांचे पाठबळ व काम करण्याची योग्य दिशा मिळाली पाहिजे.

शेवटी कचरा संकलन व वाहतूकीची जबाबदारी मनपाची असून लोकांच्या अपेक्षा मनपाकडून असतात. मनपाने काम स्वतः करावे किंवा कामाचे खाजगीकरण करावे. नागरिकांना योग्य सेवा मिळाली पाहिजे, या जबाबदाऱ्याचे भान आता सर्व मजुरांपासून सर्व स्वच्छता निरीक्षक तसेच क्षेत्रीय अधिकाऱ्यांना होऊ लागला आहे. मनपाच्या स्वच्छतेच्या सेनापती सौ. वसुधा फड यांच्या मार्गदर्शनाखाली आमची सर्व स्वच्छतेची टीम आपापल्या जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडतील, अशी मी त्यांच्याकडून अपेक्षा बाळगतो. **(क्रमशः)**

---

(भाग :७)

# कचऱ्याची प्रक्रिया व विल्हेवाट

**ना**गरी घनकचरा अधिनियम - २००० (MSW) अस्तित्वात आला. त्या नियमान्वये घनकचऱ्याच्या संकलन आणि वाहतूकीपासून प्रक्रियेबद्दल सर्व तरतूदी व जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आलेल्या आहेत. हे नियम अस्तित्वात आल्यानंतर मनपाने कुठेही कचरा बिगरशास्त्रीय पध्दतीने टाकण्यावर प्रतिबंध आहे. तरीही अनेक शहर कचऱ्याची योग्य प्रक्रिया व विल्हेवाट लावायला असमर्थ का ठरत आहे ? प्रथमतः तर प्रक्रिया व विल्हेवाटीच्या प्रक्रियेसाठी जागा लागते. शहराच्या भोवती अशा प्रकारची मोकळी जागा सहसा उपलब्ध होत नाही. नांदेड शहराचे भाग्य चांगले आहे की नांदेडपासून फार लांब नव्हे, अशा तुप्पा येथे शासनाने गायरान जमीन मनपाला या वैधानिक कार्यासाठी उपलब्ध करुन दिली आहे.

दुसरा विषय म्हणजे प्रक्रिया करण्याची उपयुक्त शास्त्रीय पध्दत होय. सर्वोच्च न्यायालयाने आता असे निर्णय दिलेले आहेत की भारतीय परिस्थितीमध्ये कंपोस्टींग ही घनकचऱ्याच्या प्रक्रियेची उपयुक्त शास्त्रीय पध्दत आहे. या सर्व विषयांचा अभ्यास करण्यासाठी मी स्वतः, मा. महापौर आणि उपाआयुक्त रत्नाकर वाघमारे यांच्यासह घनकचरा प्रक्रियेवर करीत असलेल्या काही शहरांना भेटी दिल्या. प्रामुख्याने आम्हास या प्रक्रियेतले तांत्रीक ज्ञान समजून घ्यायचे होते आणि नांदेडसाठी निवीदा भरलेल्या प्रत्येक कंपनीची कामाची गुणवत्ताही पाहायची होती. पिंपरी चिंचवड, मुंबई, दिल्ली, कानपूर व पुणे येथे घनकचरा प्रक्रियेचे प्रकल्प पाहून आम्हास त्याबद्दलची चांगली माहिती मिळाली. कंपोस्टींग या तंत्रज्ञानात सर्वात अगोदर कचऱ्याचे ओला, सुका आणि वेगवेगळया प्रकारात विभाजन केले जाते. तद्नंतर कंपोस्टींगसाठी उपयुक्त असा कचरा याचे तांत्रिक व शास्त्रीय (windrows) पध्दतीने खत तयार केले जाते. उरलेल्या खतासाठी उपयुक्त नसलेल्या कचऱ्यापासून (ज्यामध्ये काही प्लॅस्टीक इ. असते) आरडीएफ (Retuse Dirived Fual) तयार करण्यात येते. RDF एका प्रकारचे इंधन आहे, जेकी सिमेंट फॅक्टरीमध्ये कोळशाच्या ठिकाणी जाळण्यासाठी विकला जाऊ शकतो. प्लॉस्टीकच्या ब्रिकेट्स (Brickets) तयार करण्याचे तंत्रज्ञानही आज उपलब्ध आहे. बांधकाम साहित्याच्या ढिगाऱ्यापासून वीटा तयार केल्या जातात. एकंदरीत येणाऱ्या कचऱ्याच्या प्रत्येक वस्तूपासून काहीना काही विकावू पदार्थ तयार करुन त्यास रिसायकल (Recycle) करण्यात येते. येणाऱ्या कचऱ्याच्या १५ टक्क्यापेक्षा जास्त नव्हे, एवढया कचऱ्याचे (ज्यातून कोणताही Recycle Product तयार होऊ शकत नाही.) एसएलएफ (squtaring Land Feel) पध्दतीने विल्हेवाट लावली जाते. या सर्व प्रकल्पाच्या चोहोबाजूने झाडे लावून ग्रीनबेल्ट तयार केली जाते. ही सर्व प्रक्रिया शास्त्रीय पध्दतीने केली जाते आणि यातून कुठल्याही प्रकारच्या प्रदुषणाचे त्रास आजूबाजूच्या लोकांना होत नाही.

आज ज्या प्रकारे शहराचा कचरा डम्प केला जातो. त्यामुळे होणारा त्रास या प्रकल्पामुळे थांबणार असल्यामुळे पुढच्या वर्षभरात नांदेड शहराचा समावेश त्यांच्या कचऱ्याची शास्त्रीय पध्दतीने योग्य विल्हेवाट लावणाऱ्या काही निवडक शहरात होऊ शकेल.

**मंजील दूर नही....**

नांदेडकरांनी ठरवले तर नांदेड शहर महाराष्ट्राचे नव्हे तर भारतातील पहिले असे शहर ठरेल जे की, खऱ्या अर्थाने स्वच्छ असेल. मग हे शहर सर्वांना हवेहवेसे वाटणार नाही का? हे काम अशक्य नाही, अवघडही नाही, गरज आहे ती आमच्या सर्वांच्या इच्छाशक्तीची...

**पीर पर्वत हो गयी है, अब पिघलनी चाहिए**
**इस हिमालय से कोई, गंगा निकलनी चाहिए**
**मेरे सिने में नही, तेरे सीने में ही सही**
**हो कहीं भी, मगर आग जलनी चाहिए**
**सिर्फ हंगामा खडा करना मेरा मकसद नही**
**कोशीश है की ये सूरत बदलनी चाहिए**

**-(समाप्त)**

**- डॉ. निपुण विनायक (भा.प्र.से.)**
आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

-------------------------------------------------------

**(शब्दांकन : गोविंद करवा)**